दैनिक
जनमत

# ज्योती माशाळकर व प्रतीक्षा पांगे यांचा राज्यपालाच्या हस्ते गौरव



उमरगा ,दि. १४ (प्रतिनिधी) आजकालच्या वाढत्या सायबर गुन्हेगारीबद्दल समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम लातूर, धाराशिव, सोलापूर, परभणी या जिल्ह्यामधील शाळा, कॉलेज व समाजातील अनेक घटकातील लोकांसाठी राबविण्यात आला.

या उपक्रमासाठी महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातील बीसीए व बी. एस्सी. सी.एस. च्या एकूण ४० विद्यार्थ्यांनी सायबर योद्धा व ज्योती वैजिनाथ माशाळकर यांची समन्वयक म्हणून काम केले.या उपक्रमांतर्गत एकूण १९० शाळा व महाविद्यालये तसेच विविध शासकीय कार्यालये, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा न्यायालये, बँका, साखर कारखाने, इत्यादी ठिकाणी जाऊन सत्तर हजारापेक्षा जास्त लोकांना वेगवेगळ्या सायबर फ्राड्स कसे घडतात व त्यापासून सावधगिरी कशी बाळगायची याबद्दल माहिती दिली. या उत्कृष्ट कार्यासाठी महाविद्यालयाला क्विक हिल फॉउंडेशनचा स्मार्ट सायबर क्लब रनर अप -१ व तसेच बी.एस्सी. सी. एस.तृतीय वर्षातील कु. प्रतीक्षा रमेश पांगे या विद्यार्थिनीला बेस्ट सेक्रेटरी रनर अप -१ हा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल माननीय श्री सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी श्री संजय शिंत्रे, डीआयजी, महाराष्ट्र सायबर, क्विक हिल फाऊंडेशनचे अध्यक्ष श्रीमती अनुपमा काटकर उपस्थित होते. प्रा ज्योती वैजिनाथ माशाळकर ह्या उमरगा शहराच्या कन्या आहेत. त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.